नवी मुंबई महानगरपालिका
सी विभाग कार्यालय, वाशी,
बहुउददेशीय इमारत, सहावा मजला, सेक्टर- १६ए, वाशी नवी मुंबई
दुरध्वनी क्रमांक २७६५५३७० फॅक्स क्रमांक -२७६५९७४१
ईमेल - amc_vashi_ward@nmmc.gov.in

जा.क्र.नमुंमपा/सीविवा/अति/ २२१८ /२०२४
दिनांक :- २२/७/२०२४

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम २६४ (१) अन्वये धोकादायक इमारतीस दयावयाची नोटीस**

प्रति,

अध्यक्ष /सचिव
डी टाईप अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन
इमारत क्र. डी-२, डी-४, सेक्टर- ९,
वाशी, नवी मुंबई.

ज्याअर्थी, आपणांस वरील अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आपल्या मालकीच्या व रहिवास वापरासाठी असलेली इमारत धोकादायक असल्याचे या कार्यालयातील अभियंता यांनी केलेल्या सर्वेक्षणाच्या पाहणी अंती दिसून येते.

त्या अर्थी सदरची इमारत/घर राहण्यास अयोग्य असून इमारत/घर धोकादायक झाल्यामुळे जिवित व वित्तहानी होऊ शकते. सदरचा धोका हा त्या इमारतीत/घरात राहणा-या /रहिवास वापर करणा-या तसेच आजुबाजूने ये जा करणा-या नागरीकांना होऊ शकतो. त्यामुळे उक्त इमारत/घर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ अन्वये धोकादायक घोषित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६५ अ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील ३० वर्षे अथवा त्यापेक्षा जास्त जुन्या इमारतीचे /घराचे नवी मुंबई महानगरपालिकाकडे नोंदणी केलेल्या संरचना अभियंत्याकडून संरचनात्मक परिक्षण करुन घेणे अनिवार्य आहे. नोंदणीकृत अभियंत्याची नावे नवी मुंबई महानगरपालिका संकेतस्थळावर (www.nmmc.gov.in) प्रसिध्द आहे.

त्याअर्थी आपण आपल्या इमारतीचे संरचनात्मक परिनिरीक्षण करुन त्याअनुषंगाने येणा-या अहवालानुसार दुरस्ती करणे आवश्यक असल्यास त्या (Structural Audit) प्रमाणे आपल्या इमारतीची / घराची दुरुस्ती करण्यात यावी जेणेकरुन सदरची इमारत सी-१ म्हणजेच (अतिधोकादायक, राहण्या अयोग्य, तात्काळ निष्कासित करणे) या प्रवर्गात येणार नाही, म्हणून आपण दुरुस्ती केल्याचे कलम २६५ अ (३) (१) नुसार बांधकाम सुस्थित असल्याचे प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करण्यात यावे. आपणाकडून उपरोक्त प्रमाणे दुरुस्ती न केल्यास त्यामुळे होणा-या जिवीत व वित्त हानीस आपण सर्वस्वी जबाबदार रहाल याची गंभीर नोंद घ्यावी.

(सागर मोरे)
सहायक आयुक्त
सी विभाग वाशी
नवी मुंबई महानगरपालिका

प्रत :- १. मा. उप आयुक्त (अतिक्रमण), नवी मुंबई महानगरपालिका, यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सादर.
२. मा. उप आयुक्त (परिमंडळ-१), नवी मुंबई महानगरपालिका, यांना माहितीस्तव सादर.
३. मा. उप आयुक्त (आपत्कालीन व्यवस्थापन), नवी मुंबई महानगरपालिका, यांना माहितीस्तव सादर.
४. मा. अग्निशमन अधिकारी वाशी, नवी मुंबई महानगरपालिका, यांना माहितीस्तव सादर.
५. मा. वरिष्ठ पोलिस निरिक्षक वाशी, वाशी पोलिस स्टेशन, वाशी, नवी मुंबई.